आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित,

बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव ता. आंबेगाव जि. पुणे

**मराठी विभाग वार्षिक अहवाल**

**२०१८– २०१९**

दि.१५/०३/२०१९.

१. **दृक – श्राव्य कार्यक्रम :**

मराठी विभागातील एस. वाय. बी. ए. विशेष स्तर क्र. १ साठी **'नटसम्राट'** ही नाटयकलाकृती अभ्यासाला असल्या कारणाने त्या नाटयकलाकृतीची व्ही. सी. डी. मराठी विभागातील एल.सी.डी. वर विद्यार्थ्यांना दि. १६/०७/२०१८ रोजी दाखविण्यात आली. यावेळी विभागाचे २० विद्यार्थी व ०२ शिक्षक उपस्थित होते.

२. **विद्यार्थी चर्चासत्र :**

मराठी विभागाच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने दि. १२/०८/२०१८ रोजी विभागातील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे मराठीतील वाङ्‌मयीन नियतकालिके या विषयावर २० विद्यार्थ्यांनी विभागाच्या एल. सी. डी. स्क्रीनवर चर्चासत्राचे सादरीकरण केले आहे.

३. सामान्यज्ञानाची **परीक्षा**

मराठी विभागातील सर्व विद्यार्थ्यांची दि. ०३/०९/२०१८ रोजी सामान्यज्ञानाची परीक्षा घेण्यात आली. मराठी विषयाचे मूलभुत ज्ञान, दैनंदिन घडामोडी, देश व विदेशातील घडामोडी इ. वर २५ गुणांची परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेला विभागातील ३० विद्यार्थी बसले होते.

४ .वर्तमानपत्राची **कात्रणे**

मराठी विभागातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील नामवंत व दर्जेदार दैनिकातील वाङमयीन, सांस्कृतिक, समीक्षा विषयक, भाषाविषयक कात्रणे संग्रहीत केली आहे. या कात्रणांचे वाचनही विभागातील विद्यार्थ्यांनी केले आहे. या वाचनामुळे विद्यार्थ्यांची वाङमयीन, सांस्कृतिक, समीक्षा विषयक, भाषाविषयक समज वाढण्यास मदत झाली आहे.

५. **YouTube द्वारे अध्यापन :**

दि. ०१/१०/२०१८ रोजी सकाळी १०.१० वा. मराठी व इंग्रजी विभागातील सर्व विद्यार्थी एकत्रित करून नाटकाशी निगडित असलेल्या दिल्ली येथील नॅशनल स्कूल ड्रामा या नाटयविषयक संस्थेच्या कार्याचा विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. यावेळी दोन्ही विभागातील ३० विद्यार्थी उपस्थित होते.

**६. Skype द्वारे संवाद :**

दि. ०३/१०/२०१८ रोजी सकाळी ११.३० वा. जपान येथील Saoko Funada यांच्याशी द्वितीय वर्ष कला या वर्गातील निवडक विद्यार्थ्यांनी **Skype** द्वारे संवाद साधला. या कार्यक्रमासाठी प्रा. सोमनाथ जगताप यांनी विशेष प्रयत्न करून हा कार्यक्रम यशस्वी केला आहे.

**७. वाचन प्रेरणा दिन :**

महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीच्या निमित्ताने दि. १५/१०/२०१८ रोजी या कार्यक्रमातंर्गत ९.२० वा. तिसऱ्या तासाला ६० मिनिटे सामूहिक वाचन करून चर्चा घडवून आणली. या सामूहिक वाचनात भारतीय राज्यघटनेतील **'उद्देशिका'** चे अभिवाचन विविध वर्गात करून त्याच्यावर विद्यार्थी व शिक्षकांनी चर्चा घडवून आणली. या चर्चेत ३० विद्यार्थी व १० शिक्षकांनी सहभाग घेऊन चर्चेत रंगत वाढवून अभ्यासपूर्ण मांडणी करण्यात आली. या चर्चेत मराठी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर वाल्हेकर, प्रा. पोपट माने, प्रा. राजेंद्र जोशी, प्रा. सोमनाथ जगताप, प्रा. रेशमा शिंदे, प्रा. रेशमा रोडे, प्रा. डॉ. पुरुषोत्तम काळे आदी शिक्षकांनी सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सामूहिक वाचन व चर्चेमुळे विद्यार्थी वर्गात भारतीय संविधानाविषयी जागृती निर्माण झाली आहे. या चर्चेचा महाविद्यालयातील ४०० विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे.

**८. भित्तिपत्रिकेचे संपादन**

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्राचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परिचय व्हावा, तसेच विद्यार्थी मनावर सुसंस्कार होऊन आदर्श पिढी निर्माण व्हावी, या उद्देशाने भित्तिपत्रिकेचे संपादन करण्यात आले होते. प्रा. चांगुणा कदम यांनी भित्तिपत्रिकेचे संपादन केले होते.

**९. मराठी विभागाचे ग्रंथालय**

मराठी विभागाच्या ग्रंथ दालनात विविध विषयावरील मौल्यवान असे २७२ ग्रंथ व संदर्भ ग्रंथ आहेत. यात मराठीतील दर्जेदार अशी १२७ नियतकालिके आहेत. या सर्वांची अंदाजे किंमत २४३०९/– रूपये इतकी आहे. विभागातील विद्यार्थी व शिक्षक या ग्रंथालयाचा वापर आपल्या दैनंदिन अध्ययन व अध्यापनासाठी करतात.

**१०. राष्ट्रीय चर्चासत्राचे यशस्वी आयोजन**

पदव्युतर मराठी विभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेतंर्गत दि. ४ व ५ जानेवारी २०१९ रोजी दोन दिवसाचे राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले.

चर्चासत्राचे उदघाटन पुणे येथील ज्येष्ठ दिग्दर्शक व अभिनेते श्री. श्रीनिवास भणगे यांचे शुभ हस्ते झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन डॉ. विलास काळे हे होते.

'पटकथा लेखन : स्वरूप आणि चिकित्सा' या विषयावरील चर्चासत्राच्या उदघाटनपर भाषणात मा. श्री. श्रीनिवास भणगे म्हणाले की, चित्रपट, माहितीपट, लघुपट इ. चं पटकथालेखन, दिग्दर्शन करणे या वेगवेगळया आणि स्पष्ट भूमिका आहे. असंख्य स्वभावाची माणसे पटकथाकाराला दाखवावी लागतात. प्रामाणिक कलाकृतीच्या आधारे दर्जेदार पटकथा लेखनासाठी कोणत्याही शिकवणी वा कोर्सची गरज नाही. पटकथाकाराने चित्रपटाच्या निर्मितीप्रक्रियेतुन जाणे गरजेचे आहे. आदर्श पटकथा लेखनासाठी आशय व विषयाची पार्श्वभुमी, कलाकारांची चरित्रे व आत्मचरित्रे अभ्यासणे गरजेचे आहे. यासाठी भरपूर चित्रपट पाहणे सुद्धा गरजेचे आहे. उत्तम पटकथा लेखनासाठी लेखन, पुनर्लेखन होणे, शास्त्रशुद्धता जाणून घेणे, काही संकेत पाळणे इ. बाबी अत्यावश्यक आहे. चांगले चित्रपट हे माणसांच्या भावनेचं उन्नयन करण्याचे माध्यम आहे, असे प्रतिपादन त्यांनी शेवटी केले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना उत्तरप्रदेशातील अलिगढ मुस्लीम विश्वविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ. ताहेर पठाण म्हणाले की, साहित्य, समाज व चित्रपट यांचा परस्पर अनुबंध आहे. साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे. मनोरंजनाबरोबरच विचार समृद्ध करणे, संस्कृती संवर्धन, समाजपरिवर्तन, मानवतेची जोपासना करणे हे चित्रपटाचे काम आहे. माहितीचे ज्ञानात रूपांतर करण्याचे साधन चित्रपट आहे. भारतीय भाषेतील साहित्यात पटकथा लेखनाची थोर परंपरा आहे. दक्षिणेतील अनेक राजकारणी उत्तम पटकथा लेखक होते आणि आजही असल्याचे त्यांनी आपल्या भाषणातून सांगितले. मराठी साहित्यातील श्रेष्ठ व दर्जेदार कलाकृतींवर पटकथा लेखन झाल्याचे अनेक दाखले त्यांनी आपल्या भाषणातुन दिले.

मुंबई विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख व पटकथेचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. अनिल सपकाळ हे बीजभाषण करताना म्हणाले की, पटकथा लेखन हा बहुसांस्कृतिक स्वरूपाचा विषय आहे. त्यामुळे विविध भारतीय भाषेतील पटकथेची तौलनिक व सैद्धांतिक मांडणी होणे हे अत्यंत गरजेचे आहे. चित्रपट हे स्वतंत्र कला माध्यम आहे. त्याचे स्वतंत्र व्याकरण आहे. नाटक व चित्रपट हे भिन्न कलाप्रकार आहे. चित्रपट हा दिसणे व दाखविण्याचा भाग आहे. पटकथा हा चित्रपटाचा एक भाग आहे. शब्द हे त्याचे माध्यम व साधन द्रव्य आहे. सृजनात्मक स्वामित्त्व पटकथा लेखकाला मिळणे आवश्यक आहे. दिग्दर्शकाचे विधान हे अंतिम असते. आपल्याकडे १९१२ ते १९३२ पर्यंत मूकपट, १९३२ पासून बोलपट तर १९७० पासून चित्रपटाची थोर परंपरा आहे. या सर्व समृद्ध परंपरेची वर्णनात्मकते ऐवजी सैद्धांतिक मांडणी होणे, ग्रंथलेखन होणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

आज ही कला पटकथा लेखकाच्या पलिकडे दर्शक, प्रेक्षकांच्या हातात गेली आहे. त्यामुळे चित्रपट ही समिश्र व समूह कला ठरली आहे.

या प्रसंगी संस्थेचे सचिव अॅड. मुकुंद काळे, श्री. मदन देशपांडे, प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. या राष्ट्रीय चर्चासत्रात पटकथा लेखनावर ज्या शोधनिबंध वाचक व अभ्यासकांनी आपले शोधनिबंध सादर केले, ते सर्व शोधनिबंध **'रिसर्च जर्नी'** या यु. जी. सी. मान्यताप्राप्त संशोधन विषयक नियतकालिकात प्रकाशित करण्यात आले. या शोधनिबंध संग्रहाचे प्रकाशन मंचर येथील मोरडे फुड प्रॉडक्टस् प्रा. लि. चे श्री. मदन देशपांडे यांचे शुभहस्ते करण्यात आले.

या दोन दिवसीय चर्चासत्रात ' पटकथा लेखन : संकल्पना व स्वरूप', ' पटकथा लेखन प्रक्रिया आणि तंत्र', ' पटकथा – प्रत्यक्ष उपलब्ध पटकथेचा अभ्यास' इ. विषयावर श्री. श्रीनिवास भणगे (पुणे), डॉ. अनिल सपकाळ (मुंबई), डॉ. ताहेर पठाण (अलिगढ), डॉ. प्रवीण नारायण महाजन (नागपूर), प्रा. प्रसाद ठाकूर (मुंबई), डॉ. भास्कर ढोके, डॉ. रवींद्र ठाकूर (कोल्हापूर), डॉ. प्रकाश शेवाळे (नाशिक), डॉ. जया कदम (सोमेश्वरनगर), प्रा. हनुमंत मते (सोलापूर), प्रा. प्रमोद पवार (गोवा), डॉ. हनुमंत भवारी (पाबळ), डॉ. श्रीपती रायमाने (निपानी), डॉ. वैजनाथ अनमुलवाड (नांदेड), डॉ. कुंडलिक केदारी (पुणे), डॉ. शिरीष लांडगे पाटील (भेंडा), प्राचार्य डॉ. भास्कर शेळके (अकोले), इ. तज्ज्ञ अभ्यासकांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी चित्रपट व इतर कला माध्यमे, पटकथा – प्रत्यक्ष उपलब्ध पटकथेचा अभ्यास, पटकथेचे विविध प्रकार, पटकथेचे उपघटक : संविधानक, दृश्य आणि संधान, व्यक्तिरेखाटन, संवाद, गीत इ. विषयावर देशातील विविध विद्यापीठे व महाविद्यालयातील १०० संशोधकांनी शोधनिबंधाचे वाचन केले, चर्चा घडवून आणली.

या चर्चासत्रात चित्रपट पटकथा अभ्यासक प्रा. डॉ. राजेंद्र थोरात यांनी 'उदाहरणार्थ नेमाडे', 'अरण्य' आणि 'ढोह' या चित्रपटाचे युवा दिग्दर्शक श्री. अक्षय इंडीकर यांची मुलाखत घेतली.एका युवा दिग्दर्शकाचा कला क्षेत्रातील प्रवेश उपस्थित प्रेक्षक व विद्यार्थ्यांना निश्चितच मनोरंजक आणि प्रेरणादायी ठरला. जेष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. रविंद्र ठाकुर हे अध्यक्षस्थानी होते.

चर्चासत्राचा समारोप समारंभ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. तुकाराम रोंगटे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. समारोप प्रसंगी ते म्हणाले ''क्रांतिवीर दसरीबेन, कस्तुरबा गांधी, बिरसा मुंडाची चळवळ, विरप्पन गोंडर आणि इतर आदिवासी क्रांतिवीरांच्या विविध चळवळी व आंदोलने यावर दर्जेदार पटकथा लेखन झालेले नाही. कस्तुरबा गांधीना शिकविणाऱ्या येरवडयाच्या जेलमधील दसरीबेनला पटकथाकार सोयिस्करपणे विसरतात. यामुळे महात्मा गांधीच्या

जीवनचरित्रावरील पटकथा लेखन दर्जेदार कसे होईल? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. महात्मा गांधीच्या चळवळी अगोदर १२ वर्षे आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडाची ऊलगुलानाची चळवळ होती. या क्रांतिकारक चळवळीवर पटकथा लेखन नाही. या देशातील व्यवस्थेने चोर व गुन्हेगार ठरविलेल्या जमातीवर पटकथा लेखनाचा अभाव असल्याचे त्यांनी सांगितले. मृतप्राय झालेल्या मराठी चित्रपटाला नवसंजीवनी देण्याचे काम अलिकडे नागराज मुंजळे यांच्या चित्रपटाने केले आहे. यामुळे मराठी चित्रपटाने आज कात टाकली आहे. नागराज मुंजळे, नसरूद्दिन शहा सारखे अव्वंल दर्जाचे पटकथाकार आहेत, असे ते शेवटी म्हणाले.

चर्चासत्र प्रसंगी अक्षर वाङ्.मय प्रकाशन, पुणे यांनी ग्रंथ विक्री व प्रदर्शनाची व्यवस्था केलेली होती. राष्ट्रीय चर्चासत्रात अलिगढ मुस्लीम विश्वविद्यालय, अलिगढ, हिंदू विश्वविद्यालय, बनारस, कर्नाटक विद्यापीठ, गोवा विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, एस. एन डी. टी. विद्यापीठ, पुणे इ. ०९ विद्यापीठातील व विविध महाविद्यालयातील शिक्षक, संशोधक, संशोधक विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**११. मराठी भाषा पंधरवडा**

महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयात दि. ०१/०१/२०१९ ते १५/०१/२०१९ या कालावधीत विद्यार्थी कविसंमेलन , कविता वाचन, निवडक उतारा वाचन इ. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**१२.मराठी राजभाषा दिन**

मराठी विभागाच्या वतीने ज्ञानपीठ विजेते लेखक कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्म दिन दि. २७/०२/२०१९ रोजी 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी लेखक आपल्या भेटीला हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. श्री. मनोहर मोहरे हे आंबेगाव तालुक्यातील लेखक उपस्थित होते. याप्रसंगी श्री.मनोहर मोहरे म्हणाले की, 'आधुनिक काळातील तंत्रज्ञानाने मराठी भाषेपुढे आव्हाने उभी केली आहेत. भाषेची अनेक रुपे लृप्त होत आहेत. या काळात युवकांनी भाषिक समृद्धीसाठी प्रयत्न करावेत. रोज नियमितपणे वाचन केले पाहिजे. त्याबरोबर लेखनही करावे. अनेक वर्तमानपत्रे लेखनास प्रोत्साहन देत असतात. वाचनाने जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोण निर्माण होतो. पुस्तके वाचताना टिपणे काढण्याची सवय लावली पाहिजे, असे ते शेवटी म्हणाले. श्री. मोहरे यांचे शुभहस्ते मराठी विभागाने मराठी भाषेवर संपादित केलेल्या मराठी वार्तापत्राचे प्रकाशन करण्यात आले.

१३.मराठी वार्तापत्र प्रकाशन :

आदिवासी समाजातील कवी, लेखक, कथाकार फुलवडे या गावचे रहिवासी असलेले श्री. मनोहर मोहरे यांचे शुभहस्ते मराठी विभागाने मराठी भाषेवर संपादित केलेल्या मराठी वार्तापत्राचे प्रकाशन ज्ञानपीठ विजेते लेखक कवी कुसुमाग्रज तथा वि. वा. शिरवाडकर यांचा जन्म दिनी दि. २७/०२/२०१९ रोजी प्रकाशित करण्यात आले.

**१४. तज्ज्ञ साधनव्यक्तींची व्याख्याने**

| अ. क्र. | वक्ते | विषय | दिनांक | उपस्थित संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. हनुमंत भवारी, पाबळ | मराठी विनोदी कथा | ०३/०९/२०१८ | १०० |
| २ | डॉ. भास्कर शेजवळ, पुणे | विद्यार्थी आणि व्यक्तिमत्त्व विकास | १८/०९/२०१८ | १०० |
| ३ | प्रा. सोमनाथ जगताप, घोडेगाव | भाषांतर कौशल्य | ०६/१०/२०१८ | १२ |
| ४ | श्री. मनोहर मोहरे, चाकण | लेखक आपल्या भेटीला | २७/०२/२०१९ | ५० |
| ५ | प्रा. डॉ. पुरुषोत्तम काळे, घोडेगाव | कवी कुसुमाग्रजांची कविता | २७/०२/२०१९ | २० |
| ६ | डॉ. हनुमंत भवारी, पाबळ | मातृपंचक मधील कविता | ०३/०२/२०१९ | ४० |

वरील प्रमाणे विभागाचे कामकाज करत असताना संस्थेचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. आय. बी. जाधव, सहकारी प्रा. डॉ. पुरुषोत्तम काळे, प्रा. पोपटराव माने आणि सहकारी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सेवक, विद्यार्थी या सर्वांचे अत्यंत मोलाचे योगदान लाभले आहे.

मराठी विभाग प्रमुख
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता आंबेगाव जि. पुणे

प्राचार्य
बी. डी. काळे महाविद्यालय
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे